# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : संलग्न/५८०७

दिनांक : १६/०६/२०१४

मा. प्राचार्य/ संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था.

विषय—पुणे शहर, पिंपरी—चिंचवड शहर, पुणे ग्रामीण तसेच अहमदनगर व नाशिक जिल्हयातील सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्थांची संकेतस्थळे अद्ययावत करणेबाबत.

महोदय/महोदया,

सध्याच्या माहीती व तंत्रज्ञान युगामध्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे संलग्न महाविद्यायाचे /मान्यताप्राप्त संस्थेचे संकेतस्थळ.

संलग्नीत महाविद्यायाच्या /मान्यताप्राप्त संस्थेच्या संकेतस्थळावरून महिती घेऊन प्रवेश घेणा—या विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. संकेतस्थळावर जास्तीत जास्त माहिती देऊन, महाविद्यायाने/संस्थेने राबविलेल्या उपक्रमांची अद्ययावत माहिती दिल्यास अशा माहितीचे अवलोकन करणे विद्यार्थ्यांच्या फायदयाचे ठरेल, त्यामध्ये महाविद्यालयांचे मान्यतेचे तपशील, अभ्यासक्रम, नॅक श्रेणी, अनुदानित, विना अनुदानित तुकडी प्रवेश क्षमता, अभ्यासक्रमाचे शुल्क, महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्थांमधील सोयीसुविधा व छायाचित्रे, संपर्क व्यक्तीचा दूरध्वनी क्रमांक इत्यादी अनेक गोष्टींची माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या अनुषंगाने महाविद्यालयाच्या/मान्यता प्राप्त संस्थेच्या संकेत स्थळांवरील माहिती अद्ययावत करण्याबाबतची कार्यवाही त्वरीत करावी जेणे करून महाविद्यालयालाही याचा फायदा होईल आणि विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयाची /संस्थेची माहिती मिळेल.

कळावे,

आपला

S.S. Atre
१६/६/२०१४
उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)